# ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विद्यार्थांच्या व विद्यार्थीनिच्या शैक्षणिक आकांक्षेचे (Educational Aspiration) तुलनात्मक अध्ययन

**डॉ सुरेश आर पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
पी. पी. कॉलेज ऑफ एज्युकेशन
नागपूर विद्यापीठ
Email id - drsrpp@gmail.com

---

**सारांश:**

प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आकांक्षाचे तुलनात्मक अध्ययन ह्या संशोधन समस्येचे अध्ययन केलेले आहे . यात ग्रामीण क्षेत्रामध्ये शिक्षणाचे महत्त्व मुला-मुलींच्या शैक्षणिक संपादनात, शैक्षणिक आकांक्षाचे महत्व अधोरेखित केलेले आहे. ग्रामीण क्षेत्रांमध्ये जे विद्यार्थी शिक्षण प्रवाहामध्ये शिक्षण घेत आहेत त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा याबाबत मुला-मुलींच्या आकांक्षाचे तुलनात्मक अध्ययन केलेले आहे. यामध्ये मुला-मुलींच्या आकांक्षा व त्यांचे शैक्षणिक समायोजन व सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी महत्त्वाची भूमिका काय असू शकते याचा प्रामाणिक प्रयत्न विद्यार्थी कसा करतात व मुला-मुलींच्या शैक्षणिक आकांक्षा ह्यात काय फरक असतो या सर्वांचा विचार प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात आला आहे . यामध्ये मुख्यतः प्रमुख शैक्षणिक आकांक्षा या घटकाचा विशेषता ग्रामीण क्षेत्राच्या माध्यमिक स्तरावर वर्ग नववी मध्ये अभ्यास करणाऱ्या मुला-मुलींच्या शैक्षणिक आकांक्षाचा अभ्यास व त्याचे निष्कर्ष या संशोधनामध्ये विषद करण्यात आलेले आहे.

**कूट-संकल्पना :**

1. शैक्षणिक आकांश्या (Academic aspirations)
2. ग्रामीण क्षेत्र विद्यार्थी -विद्यार्थिनी

---

**प्रस्तावना:**

शिक्षण म्हणजे विकास. शिक्षणामुळे जीवन मुल्याचा विकास होतो .शिक्षण म्हणजे संपूर्ण जीवनाची तयारी. मूलभूत गरजांची पूर्तता ही शिक्षणामुळे होते. शिक्षक हे, शिक्षण- प्रशिक्षणातून समृध्द होतात . सांस्कृतिक विकास व् सामाजिक वातावरण समायोजन हे शिक्षणामुळे होते.

शिक्षणामुळे मनुष्याचा बौद्धिक, भावनिक व सामाजिक आणि क्रियात्मक क्षेत्राचा विकास होतो. सर्वांगीण विकास होतो. शिक्षणाला 'वाघिणीचे दूध' म्हटल्या जाते. कारण शिक्षण समर्थ करते. शिक्षण ही समाजाची महत्त्वाची गरज आहे . विद्यार्थ्यांना आपल्या समाजामध्ये, राष्ट्रासाठी मोठं होण्यासाठी शिक्षण हे मदत करते. शिक्षण प्रयत्न करण्याचे साहस निर्माण करते . त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थी शाळेमध्ये जातात आणि आपले शिक्षण पूर्ण करुन कौशल्य आत्मसात करतात . आपल्या जीवन मूल्य मध्ये सुधार करण्यासाठी विद्यार्थी

वर्गामध्ये सह क्रियेतून शिकतात . शाळेमध्ये आपल्या भावनांचा विकास करतात. शाळेमध्ये ज्ञानात्मक पातळीवर शिक्षणाची प्रक्रिया चालते आणि भावनात्मक पातळी ही कुटुंबातून आणि मित्र याच्या माध्यमातून होते . भारताच्या संविधानात कलम 45 नुसार वय वर्ष 14 वर्षाच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद आहे . राष्ट्राचा विकासात मोठे योगदान घडून आणायचं असेल तर मुलांना शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षणाची सर्वांना समान संधी मिळावी यासाठी शासन अनेक कल्याणकारी योजना राबवत आहे. मनुष्याला संस्कार द्यायचा असेल तो निरंतर चालणाऱ्या शिक्षण प्रक्रियेतून मिळतो . मुलांच्या मानसिक आणि बौद्धिक क्षेत्राचा विकास होतो. जॉन डिवी ने म्हटलेले आहे की ' एज्युकेशन इज फोर सोशल ग्रोथ' आणि म्हणून शिक्षणाचे महत्त्व आहे. आधुनिक काळामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे माणसाच्या बुद्धीला चालना देणारे शिक्षण . हाताला काम देणारे शिक्षण अनुभव मिळावं आणि त्याच्या आशा-आकांक्षा शिक्षणातून पूर्ण व्हाव्यात ,यासाठी शिक्षण धोरण असते. रेडन नावाचा शिक्षण शास्त्रज्ञ म्हणतो -'शिक्षण म्हणजे परिपक्व व्यक्ती अपरिपक्व व्यक्तीवर हेतुपुरस्कर व पद्धतशीरपणे टाकलेला प्रभाव होय .' ज्यामुळे वैयक्तिक व सामाजिक व आध्यात्मिक शक्तीचा समतोल होतो. सुसंवादी होणारा विकास घडवणे होय .

**शिक्षणाची संकल्पना :**

'शिक्षण म्हणजे संपूर्ण जीवनाची तयारी होय ' - हर्बर्ट स्पेन्सर

शिक्षण म्हणजे बदल. आपल्या वर्तनात घडून येणारा बदल आपल्या वागणुकीत व्यवहारात घडून येणारा बदल म्हणजे शिक्षण.

**ऋग्वेद:** ' मानवाला जे स्वावलंबी व नि :स्वार्थ निरपेक्ष करते .'

**शंकराचार्य :** 'आत्मज्ञान व आत्मसाक्षात्कार म्हणजे शिक्षण]

**स्वामी विवेकानंद :** 'केवळ डोक्यात माहिती भरणे म्हणजे शिक्षण नव्हे मानवामध्ये सुप्तावस्थेत असलेल्या दैवी पूर्णत्वाचे प्रगटीकरण म्हणजे शिक्षण होय '

**महात्मा गांधी :** 'शिक्षण म्हणजे बालकांच्या शरीर ,मन व आत्मा त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणे होय'

**उपनिषद:** काय म्हणतात 'सा विद्या या विमुक्तये' विद्या तीच जी माणसाला मोक्ष मिळवून देते'

रुसो म्हणतो 'शिक्षण म्हणजे सवय कोणत्याही कृत्रिम सवयीच्या आहारी न जाणे निसर्गानुसार वागणे'

रस्किन म्हणतो 'उत्तम आत्मे निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश'

शिक्षणाची गुणवत्ता भारतीय संकल्पनेप्रमाणे ‘मनाचा व आत्म्याचा विकास शिक्षणा द्वारे करून घेणे होय.’ शिक्षणाच्या स्वरूप संकल्पना काळानुसार बदलत गेले. कधी मनाचा अभ्यास करणारे शास्त्र , तर कधी आत्म्याचा अभ्यास करणारे शास्त्र. त्यानंतर समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र, देशाचा राष्ट्राचा विकास करणारे शास्त्र अशा शिक्षणाच्या विविध व्याख्या संपन्न होत गेल्या. गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणं या विद्यार्थ्यांचा हक्क, ते कसे मिळावे यासाठी शिक्षणाची धोरणे असतात. वर्तमान काळामध्ये आधुनिक शिक्षा मिळते. व्यवसायिक शिक्षण व कला क्षेत्राचा व सांस्कृतिक विकास घडवून आणण्यासाठी शिक्षण महतवाचे असते.

**आकांक्षा (Aspiration) :**

आकांक्षा म्हणजे दृढ संकल्प प्रबळ इच्छा होय. विद्यार्थ्यांच्या जीवनात कसोटीची क्षण येतात तेव्हा विद्यार्थ्यांचे मन कमजोर असेल तर तो निर्णय घेऊ शकणार नाही . त्यांनी खंबीर व्हावे म्हणून शिक्षण देणं मार्गदर्शन

करणं महत्त्वाचं असतं. शिक्षणाद्वारे त्याला योग्य वळण लावून त्याच्या समस्या सोडवण्यासाठी मार्गदर्शन शिक्षका द्वारे केला जाते. विद्यार्थी व त्यामध्ये आकांक्षा जर निर्माण झाल्या नाही तर तो पुढे जाणार नाही. त्याला वळण मिळणार नाही. शिक्षणाद्वारे सकारात्मक बदल घडून येणे खरे म्हणजे आकांक्षाच (Aspiration) महत्त्वाचं कार्य. आकांक्षा विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा (Motivation) जागवतो. शैक्षणिक आकांक्षा विद्यार्थी समाजातून जेव्हा शाळेमध्ये शिकायला जातो त्याच्यामध्ये व्यक्तिगत सामाजिक ,सांस्कृतिक, क्रीडा, शिक्षण या क्षेत्राचा विकास घडून येणे अपेक्षित आहे . वर्गातल्या विषय शिक्षणासोबतच सामाजिक ,शैक्षणिक, क्रीडा ,सांस्कृतिक मूल्यांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये घडून येण्यासाठी आकांक्षा विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रबळ इच्छाशक्ती निर्माण करावी लागते . शिक्षकांनी वर्गात आणि वर्गाबाहेर विद्यार्थ्यांच्या आकांक्षा(Aspiration) वाढविण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक समस्या आल्यास त्याला समाधान करण्यासाठी मार्गदर्शन करणे जरुरी आहे. परीक्षेसाठी मार्गदर्शन- ग्रेड चांगले प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन शिक्षकांनी करावे .

**शैक्षणिक आकांक्षाचे (Educational Aspiration)**

**महत्त्व (Need) :**

वर्गा मध्ये अनेक विषयांचा अभ्यास विद्यार्थ्यांना देण्यात येतो त्यासोबत त्याच्या मनाला संपन्न करण्यासाठी प्रयत्न केला जातो. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबीची आकांक्षा (Aspiration) मजबूत करण्यासाठी शिक्षण प्रक्रियेमध्ये सर्व स्तरावर त्याला मार्गदर्शन दिल्या जावं . शिक्षण तज्ज्ञांच्या मते 'आकांक्षा म्हणजे आपले निर्धारित ध्येयाची पूर्ती करण्यासाठी व्यक्तीने केलेले प्रयत्न होय .' अनेक मानसशास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांच्या आकांक्षा यावर संशोधन केलेली आहेत त्यामध्ये डॅम ,सेनोन त्यांनी आकांक्षा स्तरावरती काम केले. मार्गदर्शन केलेले आहे. संशोधन केलेले आहे. तो म्हणतो विद्यार्थ्यांमध्ये या सायकॉलॉजिकल रिएक्शन मनोवैज्ञानिक प्रतिक्रीया घडून येतात तर त्याबाबत त्याला मार्गदर्शन मिळवून शैक्षणिक te चा विकास व्हावा . या प्रस्तुत संशोधनाचा उद्देश आहे. शैक्षणिक आकांक्षा विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या स्तरावर कशा महतवाच्या आहे त्याचा अभ्यास या संशोधनातं केलेला आहे.

**Definition of Aspiration:**

'Its the level of future perform means a familiar task which level past an individual knowing this past performance in the task explicitly to reach -'

'level of aspiration is a frame of reference involving self esteem or alternatively as a standard with reference which an individual experience i.e. has the felling of success or failure " - jemes Drever

**आकांक्षेची व्याख्या :**

'भविष्यातील कामगिरीच्या पातळीचा अर्थ असा आहे की एखाद्या परिचित कार्याची पातळी भूतकाळापर्यंत पोहोचते जी एखाद्या व्यक्तीला या मागील कामगिरीपर्यंत पोहोचण्यासाठी कार्य स्पष्टतेची माहिती असते -'

'आकांक्षेची पातळी म्हणजे स्वाभिमान किंवा पर्यायाने संदर्भासहित संदर्भाची एक चौकट आहे ज्याचा वैयक्तिक अनुभव म्हणजे यश किंवा अपयशाची घसरण आहे' - जेम्स ड्रेव्हर

शैक्षणिक आकांक्षा म्हणजे शैक्षणिक भूमिका आणि वैयक्तिक संच स्वतःसाठी किंवा स्वतःसाठी प्रतिबिंबित करणे.

**संशोधन विधान :**

ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विद्यार्थांच्या व विद्यार्थीनिच्या शैक्षणिक आकांक्षेचे (Educational Aspiration) तुलनात्मक अध्ययन

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. ग्रामीण परिसरातील वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांच्या (BOYS)शैक्षणिक आकांक्षेचा शोध घेणे .

२. ग्रामीण परिसरातील वर्ग नववीच्या विद्यार्थिनींच्या (GIRLS )शैक्षणिक आकांक्षेचा शोध घेणे.

३. ग्रामीण परिसरातील वर्ग नववीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आकांक्षेची तुलना करणे .

**परिकल्पना:**

1. ग्रामीण परिसरातील वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांच्या आणि विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आकांक्षेत लक्षणीय फरक आढळून येत नाही

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. माध्यमिक स्तर ग्रामीण क्षेत्र विद्यार्थी व विद्यार्थिनी च्या शैक्षणिक आकांक्षा जाणून घेण्यासाठी ही सर्वेक्षण पद्धती उपयुक्त आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये शालेय सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला होता . सर्वेक्षणाद्वारे आधार अशी माहिती मिळविल्या गेले.

**नमुना :**

प्रस्तुत संशोधनासाठी गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक स्तर वर्ग नववीचे विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या 150 विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला.

**माहितीचे संकलन :**

प्रस्तुत संशोधन हे गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातील व माध्यमिक स्तर वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनी शैक्षणिक आकांक्षा करिता मर्यादित होते सदर संशोधन हे सन 2012 -2013 या शैक्षणिक क्षेत्रातील गोंदिया ग्रामीण माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्या पुरते मर्यादित होते सदर संशोधन हे गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातील 150 विद्यार्थ्या पुरतेच मर्यादित होते. सदर संशोधनामध्ये ग्रामीण क्षेत्रातील वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक आकांक्षा प्रश्नावली सर्वेक्षण पद्धतीने संकलित करण्यात आली. यामध्ये ग्रामीण क्षेत्रातील शासकीय पोस्ट बेसिक आश्रम शाळा मजितपूर , जिल्हा गोंदिया. एस एम भोईर आदिवासी आश्रम शाळा, कामठा. जिल्हा गोंदिया. संत ज्ञानेश्वर आदिवासी आश्रम शाळा ,पांढराबोडी. जिल्हा गोंदिया. येथील एकूण मुले- 75, मुली- 75 असे एकूण 150 विद्यार्थी घेण्यात आलीत . त्यांच्याकडून माहिती संकलित करण्यात आली.

**संशोधन साधन :**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांशा स्तराची माहिती करून घेण्यासाठी आग्रा येथील मानसशास्त्रीय शोध कार्य केंद्र द्वारा डॉक्टर व्ही. पी. शर्मा व डॉक्टर अनुराधा गुप्ता द्वारे निर्मित व प्रमाणित . शैक्षणिक आकांक्षा मापणीचा उपयोग केल्या गेला.

या संशोधन साधन प्रश्नांना विद्यार्थ्यांना अधिक योग्य वाटेल त्या विधाना समोरील अ किंवा ब पर्याया मध्ये खून करायची आहे. आपली शैक्षणिक आकांक्षा व्यक्त करायची आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाला १ किंवा ० गुण दिल्या गेले. या मापणी मध्ये विद्यार्थी जास्तीत जास्त 45 गुण घेऊ शकतो. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर त्याचा शैक्षणिक आकांक्षा स्तर निश्चित केल्या जातो.

**संशोधन माहितीचे विश्लेषण :**

संकलित केलेली माहिती व त्यासाठी संख्याशास्त्रीय तंत्र मध्यमान वापरण्यात आले. त्यावरून प्रमाण विचलन काढण्यात आलं . संख्याशास्त्रीय सूत्रांचा उपयोग करण्यात आला. त्यावरून टी मूल्य काढण्यात आले . शैक्षणिक आकांक्षा स्तर हा अतिउच्च 3३ पेक्षा जास्त गुण , 30 पेक्षा जास्त गुण उच्चस्तर, २६ते ३२गुण सरासरी पेक्षा उच्च, 25 ते 26 सरासरी ,20 ते 24 गुण सरासरीपेक्षा कमी ,18 ते 19 गुण निम्न, 11 ते 17 , 10व त्यापेक्षा कमी अति निम्न. सारणीचे विश्लेषण करण्यात आले . शैक्षणिक आकांक्षा स्तर सारणी तयार करण्यात आली. त्यावरून माहितीचं विश्लेषण करण्यात आले . दिलेली परिकल्पना तपासण्यात आली. व त्यावरून निरीक्षणे नोंदवण्यात आलीत व त्याचे स्पष्टीकरण व निष्कर्ष काढण्यात आलीत .

**परिकल्पना विश्लेषण :**

१. ग्रामीण परिसरातील वर्ग नववीच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक आकांक्षेची लक्षणीय फरक आढळून येत नाही

**सारणी क्रमांक १**

ग्रामीण परिसरातील वर्ग नववीच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आकांक्षेत फरक दर्शविणारी

**सारणी**

| SN | गट GROUP | N विद्यार्थी | M मध्यमान | SD प्रमाण विचलन | t-value | t-value सारणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | ग्रामीण क्षेत्र विद्यार्थी (मुले) | 75 | 78.74 | 8.51 | 2.72 | 0.05 | 0.01 |
| 02 | ग्रामीण क्षेत्र विद्यार्थी (मूली) | 75 | 75.04 | 8.15 | | 1.98 सार्थक आहे | 2.61 सार्थक आहे |

स्वाधीनता स्तर N1+N2-2

75+75-2

150-2=148

यासाठी ग्रामीण विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची क्रमाने एकूण 75 मुले व 75 मुली असे एकूण 150 विद्यार्थि संख्या घेण्यात आली. ग्रामीण विद्यार्थी (boys )यांचे मध्यमान 78. 74 व प्रमाण विचलन 8. 51.

ग्रामीण विद्यार्थिनी (girls) 75 याचे मध्यमान M 75.04 आणि प्रमाण विचलन SD 8.15 या दोन्ही मूल्य 2.72 आले. ही मूल्य सारणी 0.05 स्तरावर 1.98 या स्तरावर सार्थक आहे आणि 0.01 या स्तरावर 2.61 मूल्य मिळाले ते सार्थक आहे . अर्थात दोन गटांच्या मध्यमानामध्ये विचलनशीलता सार्थक आहे.

**स्पष्टीकरण:**

स्वाधीनता मात्रा 148 दोन गटांच्या माध्यमानामध्ये सार्थ करण्याकरता प्राप्त t- मूल्य 0.01 सारणी t-- मूल्यापेक्षा जास्त असावे लागते. सारणी वरून असे लक्षात येते t- मूल्य सार्थक तेच्या दोन्ही स्तरावर सारणी t-मुल्या पेक्षा जास्त आहे. अर्थात दोन गटांच्या प्राप्तांक मध्यमानातील फरक सार्थक आहे. म्हणून सदर परिकल्पना अस्वीकृत करत आहे.

**निष्कर्ष :**

अर्थात ग्रामीण वर्ग नववीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या शैक्षणिक आकांक्षेच्यां संदर्भात सार्थक फरक पडल्याचे आढळून आले आहे

**संदर्भ :**


- नायडू, अंजन कुमार,(१९८८), भिन्नभिन्न सामाजिक, आर्थिक स्थिती के विद्यार्थीयो कि शैक्षणिक आकांशा का अध्ययन , नागपूर विद्यापीठ
- अहेर ,हिरा ,(१९९५),'उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक , नागपूर , विद्या प्रकाशन.
- BUCH M.B.(1974)'SURVEY OF RESEARCH IN EDUCATION',BARODA M.S. CENTRE OF ADVANCED STUDY IN EDUCATION AND PSYCHOLOGY,VOL-1
- BUCH M.B.(1974)' FIRST SURVEY OF RESEARCH IN EDUCATION',BARODA M.S. CENTRE OF ADVANCED STUDY IN EDUCATION
- BUCH M.B.(1987)'THIRD SURVEY OF RESEARCH IN EDUCATION',BARODA M.S. CENTRE OF ADVANCED STUDY IN EDUCATION AND PSYCHOLOGY,